



# ॥ज्योतिर्मय॥

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २७५ वा ❑ मंगळवार दि.३० डिसेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## बापाने मुलगी झाली म्हणून मुलीला मारून टाकले

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

जळगावातील एका घटनेने अवघा महाराष्ट्र हादरला आहे. जळगावच्या जामनेर तालुक्यातील मोराड गावात जन्मदात्या पित्याने ३ दिवसाच्या मुलीची डोक्यात लाकडी पाट मारून हत्या केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पहूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी पित्याला पोलिसांनी अटक केली आहे. कृष्णा लालचंद राठोड असे २६ वर्षीय अटकेतील आरोपी पित्याचे नाव आहे.

कृष्णा लालचंद राठोड या या २६ वर्षीय आरोपी पित्याला मुलगा हवा होता, मात्र तीन मुलींनंतर चौथी देखील मुलगी झाल्याने तो संतापला. त्याने ,३ दिवसाच्या मुलीची निघृण हत्या केली. आरोपी पित्याने ३ दिवसाच्या मुलीच्या डोक्यात लाकडी पाट घातला आणि तिचा जीव घेतला.

सतत मुली होणे यात कोणाचाही दोष नसतो, कारण हे नैसर्गिक आहे आणि बाळाचे लिंग ठरवण्यात स्त्री आणि पुरुष दोघेही समान भागीदार असतात, जिथे पुरुषाच्या शुक्रजंतूमधील गुणसूत्रावर ( किंवा ) लिंग अवलंबून असते; स्त्रीमध्ये नेहमी गुणसूत्र असते आणि जेव्हा गुणसूत्र असलेला शुक्रजंतू डिंबाशी संयोग करतो तेव्हा मुलगा होतो, तर गुणसूत्र असलेला शुक्रजंतू संयोग झाल्यास मुलगी जन्माला येते, त्यामुळे ही एक जैविक प्रक्रिया आहे, ज्यात कोणालाही दोष देण्याची गरज नाही.

अनेकदा समाजात मुलीचा जन्म झाल्यास स्त्रीला जबाबदार धरले जाते, परंतु हे एक मोठे गैरसमज आहे. शरीरशास्त्रानुसार, लिंग निर्धारण ही एक नैसर्गिक आणि वैज्ञानिक प्रक्रिया आहे, ज्यात दोघांचीही भूमिका असते. आजकाल काही कुटुंबांमध्ये सतत मुलीच जन्माला येत असल्यास, यामागे जैविक कारणे असू शकतात, जसे की काही अभ्यासानुसार, कुटुंबात आधी ज्या लिंगाची मुले आहेत, पुढील बाळ तेच होण्याची शक्यता काही प्रमाणात वाढते, परंतु हेही निश्चित नसते. सतत मुली होणे ही एक नैसर्गिक जैविक प्रक्रिया आहे आणि यात कोणाचाही दोष नसतो. हे पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असते.मात्र अशिक्षितांप्रमाणेच शिक्षित लोकांचे समाजप्रबोधन करण्याची,या विषयी जनजागृती करण्याची गरज आहे. मुलींच्या हत्येचा आलेख सतत वाढत आहे.

बापाने मुलगी झाली म्हणून मुलीला मारून टाकण्याची असे अनेक धक्कादायक गुन्हे भारतात घडले आहेत,आणि सतत घडत आहे.जिथे मुलीचा जन्म किंवा मुलगी झाली या कारणावरून तिचा तिरस्कार करून तिला मारहाण करणे, किंवा जन्मानंतरही तिची हत्या करणे, यांसारखे प्रकार घडतात; असे गुन्हे केवळ मानसिक क्रूरता नसून ते गंभीर गुन्हे आहेत, ज्यात कन्या भ्रूण हत्या, लैंगिक अत्याचार (जसे अकोला घटना), आणि कौटुंबिक हिंसाचार (जसे सांगली आणि रायगडमधील घटना) यांचा समावेश आहे, जे कायद्याने गंभीर गुन्हा ठरतात.

अशा घटनांची काही उदाहरणे:

सांगली (आटपाडी): कमी गुण मिळाल्याने शिक्षक असलेल्या बापाने मुलीला मारहाण केली, यात तिचा मृत्यू झाला. हे फक्त मुलगी झाली म्हणून नसले तरी, लैंगिक हिंसा आणि मुलींवरील अत्याचाराचे उदाहरण आहे.

नांदेड (करकाळा शिवारात): विवाहित मुलीला प्रियकरासोबत पाहून संतप्त वडिलांनी दोघांनाही विहिरीत फेकून दिले. हे कौटुंबिक प्रतिष्ठेच्या नावाखाली घडलेल्या हत्येचे उदाहरण आहे.

रायगड: फोनवर बोलत असल्याच्या कारणावरून बापाने मुलीला खाटेच्या पायाने बांधून मारले, ही घटना मुलींवरील अत्याचाराचे भयावह चित्र दाखवते.

अकोला: १२ वर्षांच्या मुलीवर वडिलांनी, काकांनी आणि आजोबांनी लैंगिक अत्याचार केले. हे मुलगी असल्यामुळे घडणाऱ्या क्रूरतेचे उदाहरण आहे.

राजस्थान (पुष्कर): जन्मानंतर लगेचच मुलीला पुरून टाकण्यात आले, कारण वडील गरीब होते आणि आधीच तीन मुली होत्या. ही मुलगी जन्माला आल्याने झालेला अत्याचार आहे.

या गुन्ह्यांसाठी भारतीय कायद्यात तरतुदी आहेत:

मृत्यूप्रकरणे: मुलीचा जन्म झाला म्हणून किंवा इतर कोणत्याही कारणावरून तिचा खून करणे हा खुनाचा गुन्हा आहे, ज्यासाठी कठोर शिक्षा होऊ शकते.

लैंगिक अत्याचार: लैंगिक अत्याचार करणे पोस्को कायद्यांतर्गत गंभीर गुन्हा आहे.

भ्रूण हत्या: गर्भधारणेपूर्वीच मुलीचा गर्भ पाडणे हा कायद्याने गुन्हा आहे.

अशा घटना समाजातील लिंगभेदावर आधारित क्रूरता दर्शवतात आणि त्या थांबवण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी आणि सामाजिक जागरूकता आवश्यक आहे.

लिंगभेदावर आधारित क्रूरता संपवण्यासाठी समाजात खोलवर रुजलेले गैरसमज दूर करणे आणि समानतेची भावना रुजवण्यासाठी व्यापक समाजप्रबोधन करणे काळाची गरज आहे

लिंगभेदावर आधारित क्रूरतेच्या विरोधात समाजप्रबोधन अत्यंत आवश्यक आहे, कारण ही क्रूरता स्त्रियांवर होणाऱ्या शारीरिक, मानसिक, लैंगिक आणि आर्थिक अत्याचारांचे मूळ आहे, जे पितृसत्ताक विचारसरणी आणि खोलवर रुजलेल्या सामाजिक विषमतेतून जन्माला येते; यावर मात करण्यासाठी शिक्षण, कायदे आणि पुरुषांचा सहभाग महत्त्वाचा आहे, जेणेकरून स्त्रियांच्या हक्कांचा आदर होईल आणि समानता प्रस्थापित होईल.

## लोकशाही फक्त म्हणायला शिल्लक माध्यमांवर सत्ताधाऱ्यांचा अंकुश–जयदेव डोळे

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** लोकशाही फक्त म्हणायला शिल्लक आहे. कारण, लोकशाही ज्या खांबांवर आणि ज्या संस्थांवर उभी आहे, त्या संस्था हळूहळू कमकुवत आणि संपवण्याचे काम सत्ताधाऱ्यांकडून होत आहे, असे परखड मत ज्येष्ठ समाजवादी विचावंत जयदेव डोळे यांनी व्यक्त केले. शनिवारी, २७ रोजी दुपारी विवेकानंद महावद्यिालयात आयोजित प्रगतिशील साहित्य संमेलनात माध्यमे आणि लोकशाही प्रजासत्ताकात विचार स्वातंत्र्याची आवश्यकता या विषयावरील परिसंवादात डोळे बोलत




होते. डोळे म्हणाले, टेलिव्हिजनच्या कॅमेऱ्याला कायम एक ॲक्शन हवी असते. कुणी विचारी माणूस पुस्तक वाचत बसलाय, असे चित्र आपण कधीच या माध्यमांवर पाहिलेले नाही. या प्रकारचे काही या माध्यमांवर होतही नाह. यांना कायम सनसनाटी हवी असते. त्याचबरोबर सोशल मीडिया म्हणून जे काही माध्यम म्हणतो, ते फ ेसबुक हे विचारी लोकांसाठी नाहीच, ते जगातली अनेकांची सरकार उलथवून टाकण्याचे एक साधन झाले आहे, असेही डोळे यांनी स्पष्ट केले. ही फ ेसबुक, ट्विटर अशाा माध्यम संस्थेचे मालक लोक व्यावसायिक आहेत. त्यांनी हे साधन विचारी माणसांसाठी काढलेलं नाही. सोशल मीडियाच वापर करणारे सर्वात जास्त लोक भाजपचे आहेत. पण मुळात झुकेरबर्ग आणि मस्क ही उद्योजक उजव्या विचाराची लोक आहेत. अनेक प्रश्नांवर पांघरून घालणारी हे लोक आहेत. यामध्ये सांस्कृतिक राष्ट्रवाद फोफावला असून, तो पोटापाण्याचे प्रश्न दिसू देत नाही, असेही डोळे म्हणाले. या प्रगतिशील साहित्य संमेलनातील परिसंवादात जयदेव डोळे हे अध्यक्ष होते, तर डॉ. किशोर शिरसाट, पत्रकार दत्ता कानवटे, पत्रकार रोशनी शिंपी आणि सोशल मीडिया प्रभावक अनिकेत म्हस्के हे सहभागी होते. यावेळी छत्रपती संभाजीनगरमधील साहित्यप्रेमी आणि पुस्तकप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उल्का वर्षाव : आकाशीय अग्निपुष्पांचे वैज्ञानिक आणि विलोभनीय दर्शन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

रात्रीच्या गगनात निळ्याशार अंधाराचा एक विशाल समुद्र पसरलेला असतो, आणि अचानक त्या शांततेत क्षणिक तेजस्वी अग्निपुष्पांची झळकणारी रेषा उमटते; जणू आकाशातील तारांगणाने आपले हृदय उघडून विस्मयकारक सौंदर्य सादर केले आहे. हा चमत्कार म्हणजे उल्का वर्षाव जो विज्ञान आणि कुतूहलाचे, श्रद्धा आणि सौंदर्याचे अद्वितीय संगम साकारतो. प्राचीन भारतीय संस्कृतीत उल्का वर्षावाला संकेतात्मक अर्थ दिला गेला, तर आधुनिक खगोलशास्त्रानुसार तो धूमकेतूंच्या प्रवासामुळे होणारा नैसर्गिक घटना आहे. मानवाच्या मनात जणू आश्चर्याची ज्योत पेटवणारा हा आकाशीय उत्सव आहे, ज्यामध्ये प्रत्येक उल्कापिंड आपली अदृश्य कहाणी सांगतो. असा होणारा उल्का वर्षा तून काही वेळाच दिसतो परंतु अवकाश प्रेमींना हा उल्का वर्षा पाहणे ही एक सुवर्णसंधी असते याचा लाभ अवकाश प्रेमींनी खगोल प्रेमींनी सर्व पालकांनी घेऊन आपल्या पुढील पिढीला ही खगोलीय घटना कशी घडते याची वैज्ञानिक माहिती देऊन त्या पाठीमागचा गैरसमज अंधश्रद्धा दूर करावी. या साठी हा लेख लिहिला आहे.

उल्का म्हणजे काय? हे आपल्याला आधी जाणून घेतले पाहिजे.

आपल्या ग्रहाभोवती अनंतसंख्येने फिरणारे सूक्ष्म खडककण, धातू व बर्फाचे तुकडे म्हणजे उल्कापिंड (मेटवरॉईड्स). जेव्हा हे पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करतात, तेव्हा त्यांना हवेशी होणाऱ्या घर्षणामुळे प्रचंड उष्णता निर्माण होते आणि ते जळू लागतात. या जळलेल्या कणांमुळे आकाशात दिसणाऱ्या तेजस्वी रेषेला उल्का म्हणतात.

जर हा कण पूर्णपणे जळला नाही आणि पृथ्वीवर आदळला, तर त्याला



उल्कापात म्हणतात. उल्कापात हा लाखो वर्षातून क्वचित प्रसंगी घडतो. परंतु उल्का वर्षाव ही अशी घटना आहे ही एका वर्षात अनेक वेळा घडणारी घटना असते जिथे एका रात्रीत किंवा काही दिवसांत हजारो उल्का एकाच दिशेने दिसतात, जणू आकाशातून अग्निपुष्पांचा सुसंगत वर्षाव होत आहे.

हा उल्का वर्षाव का होतो? हे माहित आहे का आपणास. धूमकेतूमुळे हा वर्षा आपल्याला दिसतो. धूमकेतू म्हणजे काय आणि तो कसा तयार होतो?

उल्का वर्षावाची धूमकेतूशिवाय कल्पनाही केली जाऊ शकत नाही. धूमकेतू हा सौरमालेचा एक बर्फ–धूळ–खडकांचा आकाशीय पिंड आहे. तो मुख्यतः सौरमालेच्या बाह्य प्रदेशात, विशेषतः क्युपर पट्टा (कुपर बेल्ट) किंवा ओर्ट मेघ (ओर्ट क्लाऊड) मध्ये तयार होतो.

धूमकेतूची रचना प्रामुख्याने पाणीचे बर्फ, कार्बन डायऑक्साईडचे बर्फ, मीथेन व अमोनियाचे बर्फ, सूक्ष्म खडक व धूळ यापासून बनलेली असते. जसे सूर्याजवळ येतो, त्याच्या उष्णतेमुळे बर्फ वितळतो आणि त्यातून वायू व धूळ बाहेर पडतात. या वायू व धुळीमुळे धूमकेतूच्या भोवती कोमा तयार होते आणि त्याच्याबरोबर दीर्घकाळ टिकणारी शेपटी दिसते. ही शेपटी उल्का वर्षावाचे मुख्य कारण ठरते, कारण पृथ्वी जेव्हा या शेपटातून फिरते, तेव्हा हजारो उल्कापिंड एकाच दिशेने आकाशात झेपावतात.



सौ सुरेखा राजेंद्र शेजवळ
मा.उपशिक्षिका कन्या शाळा,
सातारा. फोन :9822749758

**(क्रमशः)**

## विजय कदम यांच्या मायेची भूक कवितेची निवड

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**रहिमतपूर –** आखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ आयोजित ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २०२६ या प्रतिष्ठित साहित्य सोहळ्याचे आयोजन सातारा येथील शाहू स्टेडियममध्ये १ ते ४ जानेवारी दरम्यान होणार आहे. या संमेलनातील प्रमुख आकर्षण असलेल्या कविकट्टा विभागात सातारा जिल्ह्यातील मूळ गाव अपशिंगे असलेले रहिमतपूर गावचे सुपुत्र कवी,लेखक आणि व्याख्याते विजय उषा शहाजी कदम यांना कविता सादरीकरणासाठी संधी मिळाली आहे. त्यांच्या ''मायेची भूक'' या कवितेची विशेष निवड करण्यात आली असून या कवितेच्या सादरीकरणाची रसिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. सातारा येथील साहित्य संमेलनात कवितेची सादरीकरण करण्याच्या मिळालेल्या संधीबद्दल त्यांचे विविध क्षेत्रातील





मान्यवरांकडून कौतुक आणि अभिनंदन करण्यात येत आहे.त्यांचे साहित्य क्षेत्रातील योगदान ही महत्वपूर्ण आहे. त्यांचा नुकताच ''भटक्या'' नावाचा कवितासंग्रह मे २०२५ मध्ये प्रकाशित झाला आहे.तसेच आतापर्यंत विविध वर्तमानपत्रात, दिवाळी अंकात आणि प्रातिनिधिक काव्यसंग्रहात कविता आणि लेख प्रकाशित झाले आहेत.

तसेच कवी विजय कदम हे माऊली करिअर अकॅडमी रहिमतपूर च्या माध्यमातून अनाथ व गरजू मुलांना मोफत मार्गदर्शन करतात. तसेच पलपब प्रकाशन संस्थेचे सातारा जिल्हाध्यक्ष व साहित्य विश्व मंडळाचे सचिव आहेत.ज्यांच्या माध्यमातून मराठी साहित्याची सेवा करण्याचे कार्य चालू आहे.तसेच त्यांच्या साहित्यिक, शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना आतापर्यंत १२ राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत.










# जात्यावरच्या ओव्या......

फुईन केला शीरा
मावशीन केले लाडु
पाहून शिदोरी
मायीला आल रडू ||४२१||

जीवाला नाही बर
गेला सरून महीना
लेक सासुरवाशीण
काही भेटाया येईना,, ||४२२||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758




# मानवतेचा आणि सेवेचा प्रकाश : डॉ. प्रकाश आमटे

ज्योतिर्मय साहित्य


शक्यतो वानरांची शिकार कोणी करत नाही पण एकदा काही आदिवासी माणसे एका वानरीणीची शिकार करून तिला घेऊन जात होते. वानरी मृत झाली होती पण तिचे पिलू जिवंत होते. ते तशाही अवस्थेत तिचे दूध पिण्याचा प्रयत्न करीत होते. कोणत्याही सहृदय व्यक्तीचे मन हेलावून टाकणारे ते दृश्य होते. प्रकाश यांचीही अवस्था काही वेगळी नव्हती. त्यांनी त्या आदिवासींना त्या पिलाला सोडून द्या म्हणून विनंती केली. पण ते म्हणाले की आमच्या लेकरांना खायला काय द्यायचे ? तेव्हा डॉ प्रकाश यांनी त्यांना डाळ तांदूळ दिले. तेव्हा आदिवासींनी ते पिलू त्यांच्या हवाली केले. ही त्यांच्या प्राणी अनाथालयाची पहिली सुरुवात होती. पुढे मग जंगलात सापडलेली अनाथ पिले आदिवासी डॉ प्रकाश यांना आणून देऊ लागले. आपल्या आईलाही ज्यांनी पाहिले नाही अशा या अनाथ पिलांना आईची माया डॉ प्रकाश यांनी दिली.



हेमलकसा इथे साधारणपणे १९७४ च्या सुरु झालेल्या लोकबिरादरी प्रकल्पाला आता ५० वर्षे पूर्ण झाली आहेत तर २६ डिसेंबर हा डॉ प्रकाश यांचा जन्मदिवस. आता त्यांचं वय सुमारे ७६/७७ वर्षे असावं. या दरम्यान जीवनातील खूप चढउतार या दाम्पत्याने अनुभवले आहेत. शून्यातून विश्व निर्माण करणं म्हणजे काय असतं याचा मूर्तिमंत आदर्श म्हणजे आमटे कुटुंब. तोच वारसा डॉ प्रकाश आणि मंदाताई यांनी पुढे चालवला. अनेक आदिवासींना मोफत वैद्यकीय सेवा पुरवली. त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. त्यांची पुढची पिढीही हा वारसा जपते आहे, पुढे नेते आहे. आपल्या परिसरातील रुग्णांची सेवा करता करता डॉ प्रकाश याना गेल्या वर्षी एका दुर्धर आजाराचा सामना करावा लागला पण सेवाकार्याची पुण्याई पाठीशी असल्याने त्यातूनही ते सुखरूप बाहेर पडले. आदिवासींची सेवा करताना त्यांनी भेदभाव केला नाही. अनेक नक्षलवाद्यांवरही त्यांनी उपचार केले, त्यांचे समुपदेशन केले. भ्रष्ट आणि लाचखोर अधिकाऱ्यांची दूर रवानगी केली.

(क्रमशः)



# दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५



## मंगलाचरण


ज्योतिर्मय साहित्य

त्याचप्रमाणे मराठी भाषेच्या बाबतीत पंडीत लोक वागतात, मराठी मध्ये अर्थ भरलेला आहे. वेदांत ''सिध्दांत हे ज्याला समजती तो खरा भाषा प्रेमी होय. आपल्या अंगणात परीस पडलेला असेल तर तो घ्यावा. त्याचप्रमाणें मराठी मध्ये जर सोपे पण अनुभव सिध्द अद्वेत आत्मज्ञान सहजासहजी मिळत असेल तर ते अवश्य घ्यावे.

वेदांतज्ञान किंवा अध्यात्मज्ञान संस्कृत मध्ये असो किंवा मराठी मध्ये असो ते यथार्थ पणे आकलन होण्यास सत्समागम जरूर आहे. समर्थ म्हणतात की विद्या मिळवण्यासाठी श्रम न करता केवळ सत्समागम केला तर सगळा शास्त्रार्थ सहजपणे समजतो.

मित्रांनो एक खरं तर अगदी तळमळीने पोटतिडकीने सांगणे आहे की सतत चांगल्या विचारांच्या माणसाच्या सहवासात रहावे चांगले ग्रंथ वाचावे. व हा मनुष्य जन्म जो एकदाच मिळाला आहे त्याचे सोने करून घ्यावे.

श्रीराम जय राम जय जय राम
जय जय रघुवीर समर्थ



# अनन्यतेतच भक्ति जन्म पावते

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

भगवंतावाचून भक्ती होत नाही. ज्याप्रमाणे सौभाग्यवती म्हटली की तिला नवरा असायचाच, त्याचप्रमाणे भक्ती म्हटली की तिथे भगवंत असलाच पाहिजे. भगवंत हा भक्तीचा प्राण आहे. भक्ती आणि माया दोघी भगवंताच्याच स्त्रिया आहेत. पण, म्हणून त्या सवती आहेत. दोन सवती एके ठिकाणी सुखाने नांदत नाहीत हा जगाचा अनुभव आहे. मायेला बाजूला करायची झाल्यास आपण भक्तीची कास धरावी. म्हणजे ती मायेस आपोआप हुसकावून लावते. मायेचे वर्चस्व नाहीसे झाले की आपले काम होऊन जाते.

तालमीत जाणारा आणि तालमीत न जाणारा यांच्यामध्ये थोडातरी फरक दिसायला पाहिजे; तालमीत जाणाऱ्याच्या शरीरावर थोडातरी पीळ दिसायला हवा ना ! तसेच, जो भक्ती करतो त्याच्या वृत्तीमध्ये थोडा तरी फरक पडला पाहिजे. आपल्याला जर विद्या पाहिजे असेल तर आपण विद्वानांची संगत धरली पाहिजे, त्याचप्रमाणे आपल्याला भक्ती आणि आनंद पाहिजे असेल तर भगवंताची संगत धरली पाहिजे. सर्व सृष्टी रामरूप दिसणे हेच भक्तीचे फळ आहे. याकरिता अनन्यतेची अत्यंत जरुरी आहे. अनन्यतेतच भक्ती जन्म पावते. द्रौपदीची अनन्यता खरी. भगवंताशिवाय मला दुसरा कोणताच आधार नाही याची खात्री पटणे, हेच अनन्यतेचे स्वरूप. माझी प्राप्ती करून घ्यायची असेल तर भक्ती हेच साधन आहे असे स्वत: परमात्म्यानेच सांगितले आहे. जसे नामस्मरण विस्मरणाने करता येत नाही, त्याचप्रमाणे भक्ती अभिमानाने करता येत नाही.

समजा, एखाद्या माणसाचे लग्न झाले. तो काल ब्रह्मचारी होता आणि आज गृहस्थाश्रमी झाला; तरी त्याच्या जीवनातले इतर व्यवसाय चालूच राहतात. त्याचप्रमाणे, आपण भगवंताचे झालो तरी आपले प्रपंचाचे सर्व व्यवहार पूर्ववत् सुरळीत चालतात. जी जी गोष्ट घडेल ती ती आपण भगवंताला सांगावी. भगवंताच्या अस्तित्वाची जाणीव ठेवण्यासाठी, भगवंताला सांगून प्रत्येक काम करावे. भक्तीने भगवंत साधतो आणि फलाशा आपोआप कमी होतात. म्हणून आपण उपासना किंवा भक्ती वाढवावी. 'मी देही आहे,' असे म्हणता म्हणता आपण या देहाचे झालो; त्याचप्रमाणे मी देवाचा आहे असे म्हणत गेल्याने आपण देवरूप होऊन जाऊ. पण हे होण्यासाठी सगुणोपासनेची जरुरी आहे. रस्ता चालून गेल्याशिवाय जसे आपले घर गाठता येत नाही, त्याप्रमाणे सगुणोपासनेशिवाय आपल्याला उपाधिरहित होता येत नाही. राम कर्ता आहे ही भावना म्हणजेच सगुणोपासना, आणि हेच खऱ्या भक्तीचे स्वरूप आहे. ' तू जे देशील ते मला आवडेल ' असे आपण भगवंताला सांगावे, आणि 'माझ्या देवाला हे आवडेल का ?' अशा भावनेने जगात वागावे.

घडणारी प्रत्येक गोष्ट भगवंताच्या इच्छेने घडते अशी भावना कायम ठेवणे म्हणजेच भक्ति करणे होय.

# || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

## अविद्या

ज्योतिर्मय साहित्य

अंध तम: प्रविशंति विद्यामुपासते/ततो भूत इव ते तयोय विद्यायां रता://

परमेश्वर प्राप्ती हेतूने केलेला शास्त्र अभ्यास व निष्काम कर्म म्हणजे विद्या.

जे लोक अविद्येची उपासना करतात ,त्यांचा शेवटी अज्ञान स्वरूप घोर अंधकारात प्रवेश होतो. जे नुसत्या शास्त्राचे पठण करून मीथ्याभिमानाने मत्त होऊन ''आमच्यासाठी काही कर्तव्य उरलेले नाही'' अशा अविर्भावात कर्तव्य कर्म न करता शास्त्र विपरीत कर्मात रत होतात. तेही घोर नरकाला प्राप्त होतात.

विद्यां चाविद्याच यस्त द्वेदो भयँ सह/अविद्यया मृत्यूं तिर्त्वा विद्यांमृतमश्नुते//

जो मनुष्य ज्ञानतत्त्व व अज्ञान कर्म या दोन्हींना यथार्थपणे जाणतो, तो कर्तव्यकर्माचे अनुष्ठानने मृत्यूला पार करून ज्ञानाच्या अनुष्ठानाने अमृताची म्हणजे परमेश्वराची प्राप्ती करतो.

जो ज्ञाता सर्व जग स्वत:मध्ये पाहतो, तसेच सर्व जगात आपल्याला पाहतो, तो कशाचाच तिरस्कार करीत नाही. तेव्हा त्याला शोक व मोह कसा असणार? केवळ कर्म (अविद्या) किंवा केवळ ज्ञान( विद्या )यांच्याद्वारे सर्वोच्च श्रेयस प्राप्त होऊ शकत नाही त्यासाठी दोन्हीचा समुच्चय असणे आवश्यक आहे.

वरील श्लोकाच्या भावार्थावरून ज्ञान म्हणजेच विद्या किंवा ब्रह्मविद्या होय हे लक्षात येते.

*अविद्या*:- *भोगाच्या प्राप्तीसाठी साधन रूप कर्मांचे अनुष्ठान म्हणजेअविद्या होय* वेद उपनिषदा प्रमाणे, अविद्या म्हणजे केवळ माहीत नसणे ,असे नसून *सत्याचे विपरीत ज्ञान म्हणजे अविद्या आहे* अविद्येचा रस्ता हा विघटनाचा असतो. यात दुःख, अंधकार, मोह शोक हे भरलेले असतात.

वेदांतानुसार अविद्या ही मायेचाच एक भाग आहे जी जीवाला सत्य विसरायला लावते आणि असत्याशी आसक्त ठेवते.

*अविद्येचे पांच प्रकार*

१ *अध्यारोप* (वस्तूवर चूक अर्थ लावणे) उदा.- अंधारात दोरीला साप समजणे.

जिथे जे नाहीच, ते आपण आहे., असे मानतो. उदाहरणार्थ मी देह आहे. मी दुःखी आहे. मी मरतो. इत्यादी

२ आवरण:- (सत्यावर पडलेले अज्ञानाचे आवरण)* उदाहरणार्थ जसे ढग सूर्य झाकतात. पण सूर्य अस्तित्वात असतो. तसेच अज्ञान मन बुद्धीवर पडल्याने आत्म्याचे तेज दिसत नाही. हे अविद्येचे आवरण रूप आहे.

३ विक्षेप:- (चुकीची कल्पना निर्माण करणे), अज्ञानामुळे मन अनेक भ्रम निर्माण करते. भीती आसक्ती, राग, लोभ, अभिमान इत्यादी भावना उत्पन्न होतात. हे अविद्याचे सक्रिय रूप होय. हे रूप मनाचा व्यत्यय घडवते.

४ त्रिगुणात्मक रुपे : सत्वगुणी अविद्या- ज्ञानासारखी पण अहंकार युक्त.

रजोगुणी अविद्या-- कर्म प्रधान

तमोगुणी अविद्या -- अंधकार, आळस.क्रोध,द्वेश,हिंसा.

५ विवेक चुडामणी या आद्य शंकराचार्यांच्या ग्रंथानुसार, अविद्या जीवावर पाच आवरणे घालते.

१ ''अज्ञान'' आत्म्याचे खरे स्वरूप न समजणे.

२ अस्मिता मी देह आहे हा अभिमान.

३ ''रागइंद्रिय'' सुखाची आसक्ती.

४ ''द्वेष'' अप्रिय वस्तूंची द्वेष भावना.

५ ''अभिनवेश'' मृत्यूची भीती आणि जीवनाची अति आसक्ती

यांनाच पतंजली ऋषींनी पांच क्लेश म्हणून सांगितले आहेत. आता विद्या व अविद्या यातील काय फरक आहे तेही पाहू.

(क्रमशः)



# || अभंग-माधव ||

माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630



## वैष्णवांचे रूप


कृष्ण घननिळा । विठ्ठल ही काळा ।
भजे भक्त मेळा । उभयांना ॥१॥
वैष्णवांचे रूप । असे काळे जरी ।
चित्त शुद्ध भारी । त्यांचे असे ॥२॥
आनंदे नाचितो । वैष्णवांचा मेळा ।
अपार उमाळा । दाटतसे ॥३॥
माधव हा म्हणे । विठू जरी काळा ।
झुलती हिंदोळा । भक्ती रुपी ॥४॥



# आरोग्य संजीवनी

## घसा दुखणे

ज्योतिर्मय साहित्य



घसा हा आपल्या अन्नमार्गातील तसेच श्वसनमार्गातील एक महत्त्वाचा अवयव आहेच पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपण ज्यामुळे आवाज काढू शकतो ते स्वरयंत्र या घशातच असते. त्यामुळे घशाची काळजी घेणे जसे गरजेचे असते तसेच घशाच्या किरकोळ तक्रारींवरही उपचार त्वरीत करणे आवश्यकच असते. खोकला, सर्दी झाली असल्यास आपला आवाज बदलतो. अनेकवेळा घसा बसतो आणि बोलणे अवघड होते याचा अनुभव आपण कधी ना कधी घेतलेला असतोच. त्यामुळे या महत्त्वाच्या अवयवासाठी घरच्या घरी कोणते उपचार करता येतात त्याची माहिती खाली दिली आहे.

१) घसा दुखणे दूध , हळद व साखर याचे गरमागरम मिश्रण पिण्याने घसादुखी कमी होते, लवंग चघळण्यानेही घसादुखी कमी होते.

२) घसा खवखवणे- बरेच वेळा खवखवण्याचा त्रास आपल्याला होतो. अशावेळी घसा खवखवत असल्यास खडी साखर आणि चिमूटभर कात (विडे करताना घालतात तो) जिभेवर ठेवून चघळावा. त्याने खूपच आराम पडतो.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

३) खोकल्याची ढास येत असल्यास- आख्खा सालासकट वेलदोडा गालात धरावा. अथवा कात व साखर मिश्रण चघळावे. कफ झाला असल्यास विडयाची पाने ठेचून रस काढावा व मधाबरोबर चाटावा. छाती, पाठ शेकण्यानेही कफ सूटून येतो.

४) तोंड येणे, तोंडात पुरळ तोंड येणे म्हणजे जीभ हुळहुळी होणे. तोंड येण्यामुळे जीभेवर फोड येतात तसेच तिखट अजिबात जिभेला लागू देत नाही. जीभ लालभडक होते. अशा वेळी दोन दिवस आहारात फक्त द्रव पदार्थ घ्यावेत. फळांचे रस, दूध, ताक, सरबत यांसारखे पदार्थ घ्यावेत. तोंड येण्या मागे बिघडलेले पचन हे मुख्य कारण असते. आणि पोटाला दोन दिवस आराम दिला की पोट मूळपदावर येते आणि जिभेला आलेली लाली व पुरळ कमी होण्यासही मदत मिळते.

५) घशात जळजळ, घसा बसणे- वेलदोडा दाणे व साखर एकत्र चघळणे. बसलेल्या घशावर कोमट केलेल्या मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करण्यानेही घसा दुखणे, बसणे याला उतारा पडतो.

***



# लघु बोधकथा

*समाधान*

*एक श्रीमंत सावकार होते, अलोट संपत्ती होती, पुढील सातपिढ्या जरी बसून खाल्या तरी संपणार नाही एवढी संपत्ती मिळवली होती, तरी पण हा श्रीमंत सुखी नव्हता. मनात काहीतरी विवंचना होती त्यामुळे रात्रभर झोप यायची नाही त्यामुळे खऱ्या सुखाला तो वंचित झाला होता.*

*त्याने प्रत्येकाला विचारावे मी काय करू म्हणजे या विवंचनेतून मी सुटेन आणि मला सुखाची झोप लागेल ! त्याला कोणीतरी सांगितले तू संताना शरण जा म्हणजे संतचं यातून तुला सोडवतील .*

*श्रीमंत संतांच्या शोधार्थ निघाला वाटेत एका झाडाखाली एक साधु महाराज बसले होते. त्यांना नमस्कार करून श्रीमंत म्हणाला महाराज मला काहीही कमी नाही पुढील सात पिढ्या बसून खातील एवढं मिळवलं आहे तरी मी सुखी नाही, एक विवंचना मला झोप येवु देत नाही त्यामुळे मी सुखी नाही.*

*साधु महाराज म्हणाले आधि विवंचना काय आहे ते सांग म्हणजे त्यातून कसे सुटायचे ते सांगतो, श्रीमंत म्हणाला महाराज तसं म्हणाल तर मला काहीही विवंचना नाही पण एकच विवंचना आहे आणि ती म्हणजे माझ्या आठव्या पिढीचे काय होईल ? कारण सात पिढ्याचे कमवून ठेवले आहे, चिंता आहे ती आठव्या पिढिची !*

*साधु महाराज हसले आणि म्हणाले काळजी करु नकोस मी तुला यातून सोडवतो. साधुनि त्याला एक किलोभर तांदळाची पिशवी दिली आणि सांगितले की त्या डोंगरावर एक म्हातारी एका झोपडीत राहते तिला हे तांदूळ देवून ये म्हणजे मी तुला तुझ्या विवंचनेतून मुक्त करतो.*

*तांदूळ घेऊन श्रीमंत म्हातारीच्या झोपडीत आला ज्या झोपडीला दार सुद्धा नव्हते. ती भगवंताच्या भजनात दंग होती, तिची भावसमाधी लागली होती, श्रीमंताच्या पायाच्या आवाजाने आजीची भावसमाधी भंग पावली, तिने वर बघितले आणि म्हणाली का आलास बाबा ईथे ? तो म्हणाला म्हातारे तुला तांदूळ द्यायला आलो आहे हे घे मग मी जातो.* *क्रमश:*

# टेरेसवरील कवितांनी गाठली अभाळाएवढी उंची

**ज्योतिर्मय साहित्य**



ध्यास गझल साहित्य समूह आयोजित टेरेसवरील कवितांची मैफल सातारा परिसर येथे कवी हनुमंत सोनवणें ह्यांचे घरी चांगलीच रंगली. चिरंजीव श्रेयस सोनवणे ह्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित ही शब्दस्नेहींची अनौपचारिक काव्य मैफल उत्तरोत्तर चांगल्या उंचीवर गेली. कवी गिरीश जोशी ह्यांच्या संकल्पनेवर आधारित ह्या मैफलीत एकापेक्षा एक आशयघन, रसाळ कवितांचे चांदणे रसिकांना वेचायला मिळाले. विविध विषयांना हात घालणाऱ्या कविता, गझल, अभंग, कवींनी सादर करून श्रोत्यांना काव्यसंतुष्ट केले.

मैफलीची सुरुवात प्रतिमा पूजन आणि दीप प्रज्वलनाने झाली. माजी विभागीय आयुक्त डॉ पुरुषोत्तम भापकर ह्यांनी अतिथीपद भूषविले, कार्यक्रमाचे अध्यक्ष पद श्री महेश खरात ह्यांनी भूषविले, संतोष देशमुख, चंद्रकांत पांडे, दत्तात्रय मोरे, नारायण पुरी ह्यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कवी रमेश ठोंबरे ह्यांनी,

फळे, सावली, श्वास दिला अन कुऱ्हाडीसही दांडा

भविष्यातले का झाडाला दिसले नाही काही! ही गझल सादर केली. मृणाल देशपांडे ह्यांनी,

**रुतलेल्या पाय वाटेवरून**
**शोधावी स्वत:ची सावली स्वत:च लावलेल्या**
**झाडांची, कदाचित त्यासाठी लागणारी**
**माती व्हावं आपण, कदाचित त्यात रुजणारं**
**बीज व्हावं आपण ही कविता सादर केली**
**युवा कवी अजय त्रिभुवन ह्याने,**
**बोलतो ते करून दाखवतो**
**हारतो पण लढून दाखवतो**
**वाटतो जो अशक्य दुनियेला**
**तोच डोंगर चढून दाखवतो गझल सादर केली.**
**याहून मोठी कुठली पदवी जगात आहे,**
**लेक सारखी आई आई म्हणते आहे**
**ही गझल रेणुका जोशी ह्यांनी सादर केली.**
**गोऱ्या पोरीच्या नाशिबीही**
**काळपट नवरे आले**
**जोड्या विजोड होत्या**
**पण घटस्फोट नाही झाले.**

**कवी प्रा.विजय पोहनेरकर ह्यांनी ही विनोदी कविता सादर करून वातावरण हलकेफुलके केले.**

**गझलकार गिरीश जोशी ह्यांनी**
**भांडून घेतले ना मागून घेतले**
**जे चार घास उरले वाटून घेतले,**
**व्हीआयपीच दिसले देवासभोवती**
**दर्शन म्हणून आम्ही लांबून घेतले,**
**आला कुणी न माळी रक्षण करावया**
**मग शेवटी फुलांनी जाळून घेतले...**
**ही गझल सादर करून वातावरणात गझलेचे रंग भरले.**
**दिलीप सोनवणे ह्यांनी,**
**नकोत केवळ प्रेमळ माता**
**नकोत केवळ आई ,**
**बाळ शिवबाला घडविण्या**
**आज हवी एक जिजाई ही कविता सादर केली.**
**डॉ सुशील सातपुते ह्यांनी ही कविता सादर केली.**
**भविष्यात होणाऱ्या राजकीय**
**चित्रपटांना माझ्या हार्दिक शुभेच्छा !**
**नोटाचा रंग बदलता बदलता**
**माझ्या तिरंग्याचा रंग बदलू नये**
**एवढीच माझी इच्छा !**
**युवा कवी ऋषभ कुलकर्णी ह्याने,**
**कुठे गेली ती माणसे नातीगोती जपणारी..**

**चालीरीती पाळणारी..सुख दु:ख वाटणारी..,ही कविता सादर केली.संध्या अचिंतलवार ह्यांनी,**

**बरे वाटते का वाघिणीस पोटचे बाळ खाताना**
**पण वात्सल्य होरपळते भुकेचा जाळ झाल्यावर..**
**ही कविता सादर केली.सुहास महाजन ह्यांनी**
**हमारा कौन है ?**
**वाह वाह तुम्हारी है**
**तालिया तुम्हारी है**
**चेहरे पर मुस्कान तुम्हारी है**
**और तो और**
**जादू की झप्पी तुम्हारी है**
**फिर यहां**
**हमारा कौन है ?**
**ही हिंदी रचना सादर केली.**
**प्रशांत नानकर ह्यांनी,**
**ते दिन आगळे होते, जगण्यातही बात होती..**
**दाखल्यास फक्त ठाऊक, मित्रांची जात होती**
**ही रचना सादर केली.**
**हनुमंत सोनवणे ह्यांनी**
**नुसते बघण्यासाठी मजला किती जवळून गेलीस तू,**
**अन् जरासा स्पर्श झाला किती लाजून गेलीस तू**
**ही कविता सादर केली.**
**पंडित वराडे ह्यांनी,**
**गतवर्षाला निरोप देता**
**नववर्षांमध्ये पाऊल पडता**
**प्रसन्नतेने सदाफुलीसम**
**फुलत रहा, तू खुलत रहा**
**सुखासावे तू झुलात रहा ही कविता सादर केली.**
**सुनिता कपाळे ह्यांनी,**
**जाते उडुनी पाखरे**
**माय बापाचे घरटे**
**सुनं सुनं होतं घर**
**कंठ काळजाचा दाट ही कविता सादर केली.**
**दीपक नागरे ह्यांनी,**
**दिवाळीचा सण येता**
**बहीण माहेरी येते**
**मुक्या घरट्यात भावाच्या**
**सुख पेरूनिया जाते ही कविता सादर केली.**
**कवी रोहिदास शिखरे ह्यांनी,**
**लेकी तुझ्या विना दार**
**गेल्यापासून गप्प गार**
**भिंती सुद्धा बोलत नाही**
**लेकी सांत्वन त्याचे करून जा**
**लेकी दोन दिवस येऊन जा**

माहेराला राहून जा. यासोबतच


सुनील उबाळे ,रश्मी देशपांडे,रुपाली पाटील, अरविंद कुलकर्णी, मनोज अग्रवाल, माधव कुलकर्णी, ॲड. कैलास कोळपकर, विजयकुमार पांचाळ, मनोज अग्रवाल इत्यादी कवींनी बहादार कविता सादर करून उपस्थितांची वाहवा मिळविली.

माजी विभागीय आयुक्त डॉ.पुरुषोत्तम भापकर ह्यांच्या कवितेने मैफलीची सांगता झाली.

महेश अचिंतलवार ह्यांनी बहारदार सूत्रसंचालन करून मैफलीत जीव ओतला.

यासोबतच दर्दी काव्य रसिक मैफलीसाठी उपस्थित होते. ह्या मैफलीच्या यशस्वीतेसाठी कवी गिरीश जोशी, हनुमंत सोनवणे ह्यांनी परिश्रम घेतले.

***




# अभ्यासाची शक्ती

**ज्योतिर्मय साहित्य**

आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि तणावग्रस्त युगाचा विचार करताना असे ध्यानी येते की, आजच्या काळात यश म्हणजे झटपट परिणाम, तत्काळ समाधान आणि लगेच मिळणारी फळे अशी संकल्पना रूढ होत चालली आहे. सोशल मीडियावर रातोरात प्रसिद्धी, एका व्हिडिओतून मिळणारे लाखो फॉलोअर्स, किंवा एका परीक्षेत अपयश आले की सर्व काही संपले अशी भावना या सगळ्यांमुळे अभ्यास, परिश्रम आणि सातत्य यांचे महत्त्व कमी लेखले जात आहे का? असा प्रश्न समोर उभा राहतोय.

''ओलें मूळ भेदी खडकाचें अंग'' अर्थात जसे झाडाचे कोवळे मूळ हळूहळू कठीण खडक भेदते, तसेच सातत्यपूर्ण अभ्यासाने माणूस कोणतीही अडचण पार करू शकतो. शिक्षण क्षेत्रात याचे उत्तम उदाहरण दिसते. एखादा विद्यार्थी गणित, विज्ञान किंवा भाषा शिकताना ''हे मला जमत नाही'' असे म्हणतो. पण रोज थोडा थोडा अभ्यास, चुका सुधारत पुढे जाणे आणि सातत्य ठेवले तर तीच गोष्ट पुढे सहजसाध्य होते. अवघडपणा हा विषयात नसून आपल्या प्रयत्नांच्या अभावात असतो.

''दोरें चिरा कापे पडिला कांचणी'' हे उदाहरण आजच्या वैज्ञानिक आणि व्यावसायिक जगालाही लागू पडते. मोठे संशोधन, भव्य प्रकल्प किंवा यशस्वी उद्योग एका दिवसात उभे राहत नाहीत. रोजच्या छोट्या प्रयत्नांतून, अपयशांतून शिकत, चिकाटीने पुढे गेल्यावरच मोठे बदल घडतात. अगदी आरोग्याच्या बाबतीतही हेच खरे आहे. व्यायाम, योग, ध्यान किंवा आहारशिस्त हे सगळे थोड्या थोड्या सवयींनीच अंगीकारले जाते. एकाच दिवशी सर्व काही बदलण्याचा अट्टहास केला तर तो टिकत नाही.



डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर
पुणे मो. 98500 74418

आज आपल्यावर प्रचंड माहितीचा मारा होत असतो. जर ती माहिती समजून, निवडून, हळूहळू आत्मसात केली नाही तर ती गोंधळ निर्माण करते. पण योग्य अभ्यास, विवेक आणि अनुभव यांच्या साहाय्याने तीच माहिती व्यवस्थापित होते.

तुका म्हणे कैंचा बैसण्यासी ठाव । जठरीं बाळा वाव एकाएकीं ।। जगद्गुरु श्री संत तुकोबाराय उदाहरण देतात की, गर्भाशयात बाळासाठी जागा हळूहळू तयार होते. हे संयमाचे आणि नैसर्गिक प्रक्रियेचे सुंदर प्रतीक आहे. जीवनात प्रत्येक गोष्टीसाठी वेळ लागतो. करिअर, नातेसंबंध, व्यक्तिमत्त्व विकास किंवा आत्मिक प्रगती काहीही एका क्षणात पूर्ण होत नाही. संयम न ठेवता लगेच परिणाम अपेक्षित केला तर निराशा पदरी पडते.

सातत्यपूर्ण अभ्यास, चिकाटी, संयम आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर कोणतेही कार्य साध्य होऊ शकते. अवघडपणाला घाबरून थांबण्यापेक्षा अभ्यासाच्या मार्गावर ठामपणे चालत राहणे, हाच खरा जीवनमंत्र आहे.

# ...तर नववर्षाचा आनंद द्विगुणित होईल!




श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

३१ डिसेंबरच्या रात्री नववर्षाचे स्वागत दारू पिऊन करण्याकडे तरुण वर्गाचा कल असतो. नववर्षाच्या पूर्वसंध्येला पब किंवा क्लब मध्ये जाऊन पार्टी करणे, दारू पिऊन गाडी चालवणे, हुल्लडबाजी करणे, सायलंसरच्या पुंगळ्या काढून आवाज करणे, मोठ्या आवाजाचे फटाके वाजवणे, डिजेच्या किंवा लाऊड स्पिकरच्या कर्णकर्कश आवाजात भिभत्स नृत्य करणे यासारख्या गोष्टी तरुण वर्गामार्फत केल्या जातात. यावर्षी तर हे प्रमाण खूपच वाढणार आहे कारण शासनानेच पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू ठेवण्यास परवानगी दिली आहे. पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू राहणार असल्याने तरुणांनी आतापासूनच पार्टीची तयारी सुरू केली आहे. नववर्षाचे अशाप्रकारे स्वागत करणे म्हणजे कायदा सुव्यवस्थेचा भंग करणे हे माहीत असूनही अशा गोष्टी केल्या जातात. अलीकडे तर या गोष्टी खूपच वाढल्या आहेत. दारू पिऊन नववर्षाचे स्वागत करण्याची फॅशनच हल्ली रूढ झाली आहे. नववर्षाच्या पूर्वसंध्येला दारू पिलीच पाहिजे असाच समज तरुण वर्गाचा झाला आहे. दारू न पिताही नववर्षाचे स्वागत करता येते यावर त्यांचा विश्वासच नाही त्यामुळेच नववर्षाचे स्वागत दारू पिऊनच केले जाते. दारूचे दुष्परिणाम माहीत असूनही या गोष्टी केल्या जातात. दारू पिऊन भरधाव वेगात गाड्या चालवतात. दारू पिऊन भरधाव वेगात गाडी चालवल्याने बऱ्याचदा अपघात होतात. या अपघातात काही जण मरण पावतात तर काही जण जखमी होतात काही तर काही जण कायमचे जायबंदी होतात. दारू पिऊन गाडी चालवल्याने झालेल्या अपघातात घरातील कर्ता पुरुष गेल्याने कुटुंब रस्त्यावर येते. दारू पिऊन गाडी चालवणे म्हणजे स्वत:सह इतरांचाही जीव धोक्यात घालणे म्हणूनच नववर्षाचे स्वागत करताना स्वत:सह इतरांना त्रास होणार नाही याचे भान सर्वांनी ठेवावे. सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नव्या वर्षाचे स्वागत करताना बंधनाची ऐशीतैशी होणार नाही याची काळजी सर्वांनीच घ्यायला हवी.

नववर्षाचे स्वागत म्हणजे चांगल्या वाईट गोष्टी दूर सारुण नववर्षाच्या सूर्योदयाच्या साक्षीने नव संकल्पाचा अवलंब करणे, त्याचे निश्चित धोरण ठरवणे, सत्याची कास धरणे आणि नव्या जोमाने, नव्या उत्साहाने कामाला लागणे. यामुळे नव्या वर्षाचे स्वागत करताना पाश्चात्यांचे अंधानुकरण बंद करून प्रत्येकाने चांगले काम करण्याचा संकल्प केला पाहिजे.

आज जगाचा पोशिंदा संकटात आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटांने पिचलेला बळीराजा आत्महत्या करीत आहेत. देशाचे रक्षणकर्ते जवान दहशतवाद्यांच्या, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात शहीद होत आहेत. दारूच्या नशेत नववर्षाचे स्वागत करण्यापेक्षा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले, शहीद जवानांची मुले तसेच अनाथ मुलांना मदत करून आपण नव वर्षाचे स्वागत करू शकतो. आर्थिकदृष्ट्या गरीब कुटुंबाना आर्थिक मदत करून त्यांच्या मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारून, गोरगरीब मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून, वृद्धाश्रमाला, अनाथ आश्रमाला आर्थिक मदत करून आपण नववर्ष साजरे करू शकतो. रक्तदान म्हणजे सर्वश्रेष्ठ दान. नववर्षाची सुरुवात जर आपण रक्तदान करून केली तर एखाद्या रुग्णाचे प्राण वाचवल्याचे समाधान आपल्याला मिळू शकते. नवीन वर्षात अवयव दानाचा संकल्पही आपण करू शकतो.

छोटे छोटे संकल्प आपल्याला भविष्यात मोठा फायदा करून देणारे ठरू शकतात त्यामुळे आपले आणि आपल्या प्रिय जणांचे जीवन अधिक समृध्द आणि अर्थपूर्ण होऊ शकते.

जुने जाऊ द्या मरणालागुनी.....
जाळूनी किंवा पुरूनी टाका....

या कवितेच्या ओळी प्रमाणे मागील वर्षीच्या सर्व चांगल्या वाईट भावना पुसून नव्या वर्षाचे स्वागत करायला हवे. सामाजिक बांधिलकीचे ऋण सेवेतून व्यक्त करण्याचा तसेच अपप्रवृत्तींना आळा घालण्याचा संकल्प केला तर, नववर्षाचा आनंद द्विगुणित होईल.

# वसाहतवादी इतिहास दृष्टिकोन कालबाह्य - डॉ.वि.ल.धारूरकर

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : वसाहतवादी आणि मार्क्सवादी इतिहासाचे दृष्टिकोन आता कालबाह्य झाले असून आधुनिक भारताची उभारणी करण्यासाठी राष्ट्रीय दृष्टीने इतिहासाच्या अभ्यासाकडे पाहिले पाहिजे असे विचार प्रसिद्ध विचारवंत आणि माजी कुलगुरू डॉ विल धारूरकर यांनी व्यक्त केले. ते शालिवाहन संशोधन मंडळाच्या वतीने आयोजित इतिहासाचे पुनरावलोकन या विषयावरील व्याख्यानांवर बोलत होते अध्यक्षस्थानी शिवाजीराव रामरुले हे होते. आपल्या भाषणात डॉक्टर धारूरकर पुढे म्हणाले आधुनिक भारताची उभारणी करण्यासाठी इतिहासाचे नव्याने पुनरावलोकन करणे आवश्यक आहे कारण त्यामुळे इतिहासाची राष्ट्रीय दृष्टी ही नवभारताच्या उभारणीसाठी सदैव नवी प्रेरणा देऊ शकते.

प्रारंभी कार्यक्रमाचे संयोजक विजय जोग यांनी प्रास्ताविक केले तर आनंद काळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. आपल्या भाषणात डॉक्टर धारूरकर पुढे म्हणाले ब्रिटिशांनी आपल्या वसाहतवादी कालखंडात सिकंदराच्या स्वारीनंतर भारत सुसंस्कृत झाला अशा प्रकारची चुकीची मते मांडली भारताचा इतिहास हा विजयाचा इतिहास आहे पराभवाचा नव्हे निराशा आणि पराभूत मनोवृत्ती टाकून देण्यासाठी इतिहासाकडे राष्ट्रीय दृष्टीने पाहिले पाहिजे असे सूत्र त्यांनी मांडले. त्यांनी प्राचीन कालखंडात सिंधू संस्कृतीच्या मोहेंजोदारो येथील उत्खननापासून त्यामध्ये झालेल्या अलीकडील सर्व संशोधनांची थोडक्यात माहिती दिली, तसेच प्राचीन मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडातील भारतीय स्वातंत्र्याचा विजयगीशू इतिहास त्यांनी स्पष्ट केला. विजयनगरचे हिंदू साम्राज्य आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याचे महत्त्व प्रतिपादन करून त्यांनी प्राचीन आणि मध्ययुगीन संस्कृत साधनांचा नव्याने अभ्यास करण्याची गरज प्रतिपादन केली. रवींद्र परमानंद यांनी ३२ अध्यायात लिहिलेल्या शिवभारत या काव्याचे विशेष महत्त्व त्यांनी विस्ताराने स्पष्ट केले तसेच छत्रपती संभाजी महाराजांच्या





बुधभूषण या ग्रंथातील सुप्रशासनाची उदाहरणे स्पष्ट केली

आधुनिक कालखंडात मेकाले व्हेन सेंट स्मिथ यांच्यासारख्या वसाहतवादी इतिहासकारांच्या मांडणीची अव्यवहार्यता त्यांनी स्पष्ट केली. तसेच मार्क्सवादी इतिहास मिमांसा कशी कालबाह्य होत आहे यावरही त्यांनी प्रकाश टाकला. या व्याख्याना नंतर प्रसिद्ध गायक पंडित दीपक गिरी यांच्या शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला, श्री गिरी यांनी संत मीराबाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम तसेच संत श्री चोखामेळा यांच्या निवडक रचना सादर केल्या शेवटी श्री शिवाजीराव रामरुले यांनी अध्यक्षीय समारोप केला याप्रसंगी विवेकानंद विचार मंच शालिवाहन संशोधन मंडळाचे पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते. शिवाय सिडको भागातील ज्येष्ठ नागरिक डॉ. शिवाजीराव रामरुले, वाकर्स क्लबचे माजी अध्यक्ष श्री कळमकर वरे पाटील यांची विशेष उपस्थिती होती. आनंद काळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले आणि शेवटी संयोजक श्री विजय जोग यांनी सर्वांचे आभार मानले.

या कार्यक्रमास श्री बबनराव जगडे, श्री उल्हास देशमुख, अश्विनी कुमार खुल्लर, श्री गोरख शिरसे श्री नानाजी जाधव इत्यादी सिडको परिसरातील नागरिक तसेच शालिवाहन संशोधन मंडळ, विवेकानंद विचार मंच, वॉकर्स क्लबचे सदस्य सामील होते. डॉ श्री धनावले सर, मामाजी बोरा सर, श्री खोचे सर, श्री धांडगे सर, श्री जोशी सर उपस्थित होते.

जवळपास तीन तास रंगलेला हा कार्यक्रम अतिशय उत्साहात व आनंदात पार पडला.





# राम नामाचा जप केल्याने चैतन्य निर्माण होते - रमेशजी मंत्री

**ज्योतिर्मय साहित्य**

परतूर - राम नामाचा जप आणि चौपाय्यांचे पठण जेथे प्रभु राम गेले तेथे केल्याने चैतन्य निर्माण होते व मन शांत होते. या स्थानाचे एक वेगळे महत्त्व असून यामुळे मनाची अंतरिक शुद्धी होते आणि जीवनातील समस्यांवर मात करण्याची शक्ती मिळते, असे मौल्यवान विचार कथारसिक रमेशभाई मंत्री यांनी मांडले. मंदाकिनी नदीच्या तटावर असलेल्या व जेथे प्रभु श्रीराम यांचे साडेअकरा वर्षे वास्तव्य होते अशा तीर्थक्षेत्र चित्रकुट येथील आचार्य आश्रम येथे परतुर, जि. जालना येथील श्री रामचरितमानस सत्संग मंडळाच्या वतीने सात दिवसीय भव्यदिव्य असे रामकथेचे आयोजन दि. २६ डिसेंबर ते १ जानेवारी दरम्यान केले आहे. यावेळी अत्यंत मधूर व रसाळ वाणीने मंत्रमुग्ध अशा अनेक भजनासह कथाकार रमेशजी मंत्री यांनी भाविकांना भक्तिरसात चिंब भिजविले आहे. या कथेस महाराष्ट्राच्या अनेक




भागातून समाज बांधव उपस्थित आहेत. आयोजकांनी थंडीत सुद्धा मनाला उब देणारी चोख व्यवस्था ठेवली असून सर्वांची समितीचे सदस्य व स्वत: कथाकार रमेशजी मंत्री काळजी घेत आहेत.

प्रारंभी भव्य शोभायात्रा काढण्यात आली. कथेचे यजमान श्री रामचरितमानस चित्रकूट मध्ये होणाऱ्या पारायणाचे मुख्य यजमान श्री राजेंद्रप्रसादजी श्रीनिवासजी अटल सोनईवाला यांच्या हस्ते पूजन करून कथा महोत्सवास सुरुवात झाली.

कथा प्रसंगानुसार विविध झाकीचे सुंदर सादरीकरण केले जात असून भाविक मनमुराद आनंद घेत आहेत. आपल्या पहाडी, मधूर व कारुण्यभरीत आवाजात रामकथारसिक रमेशजी मंत्री रामचरितमानस सांगत आहेत.

तुलसीदासांनी हे महाकाव्य सामान्य लोकांसाठी उपलब्ध केले असून प्रभू राम हे मर्यादा पुरुषोत्तम म्हणून आदर्श पुत्र, पती, पिता आणि राजा म्हणून जीवन जगतात, जे आजही अनुकरणीय आहेत, असे सांगून राजेशजी मंत्री म्हणाले, भक्ती आणि ज्ञान यांचा संगम असून हे महाकाव्य ज्ञान आणि भक्ती यांचा समन्वय साधते, भक्तीला श्रेष्ठ मानून मोक्षप्राप्तीचा सोपा मार्ग दाखवला आहे. हे महाकाव्य जीवनातील संघर्ष, कर्तव्य आणि त्यातून मार्ग काढण्याची प्रेरणा देते, ज्यामुळे जीवन समृद्ध होते.

परतूर येथील श्री रामचरितमानस सत्संग मंडळाच्या वतीने जिथे जिथे श्रीरामांचे वास्तव्य होते अशा पवित्र ठिकाणी दरवर्षी रामचरितमानस कथा आयोजन करीत असून चित्रकुट येथील कथेचे हे तिसरे वर्ष आहे. यापूर्वी अयोध्या येथे प्रारंभ झाल्यानंतर मागील वर्षी जनकपूर येथे कथा आयोजित केली होती.

श्री रामचरितमानस सत्संग मंडळाचे राधेश्यामजी मुंदडा, संजयजी राठी, द्वारकादास तापडिया, राजेंद्रजी पोरवाल, ओमप्रकाशजी अग्रवाल, सखारामजी मुंदडा, बद्रीनारायण सोनी, बद्रीनारायणजी काबरा, जुगलकिशोर खंडेलवाल, राजेंद्रजी दरगड व महिला मंडळ यांनी व्यवस्थितपणे नियोजन केले असून यासाठी खुप परिश्रम घेत आहेत.

# जलप्रदूषणा पासून संरक्षण मोहिम राबवणारे गंगापूत्र!

**ज्योतिर्मय साहित्य**

गंगाखेड हे परभणी जिल्ह्यातील महत्वाचे शहर. ऐतिहासिक, संस्कृतिक, आध्यात्मिक व अंतिम क्रियाकर्म व दिवंगत व्यक्तीच्या अस्थी विसर्जन संस्कारासाठी महत्वाचे स्थळ. संतश्रेष्ठा जनाबाईंचे जन्मस्थळ. बालाजी मंदिर, चिंतामणी गणेश मंदिर, हनुमान मंदिर व जनाबाई मंदिराने आत्मिक सुगंध दरवळत राहातो. गोदावरीच्या नाभी स्थान समजण्यात येते. गंगाखेडच्या पवित्र मातीतून वाहणारी गोदावरी नदी ही केवळ आपल्या भागाची जीवनदायिनी नसून श्रद्धा, संस्कृती आणि संपन्नतेचे प्रतीक आहे. या नदीचे महत्त्व ओळखून तिचे संरक्षण करण्याची जबाबदारी स्थानिक समाजातील अनेक समाजसेवक आणि कार्यकर्ते पार पाडत आहेत. त्यात एक उल्लेखनीय नाव म्हणजे विधीज्ञ राजू देशमुख कांदलगावकर आणि त्यांची सहचारिणी विधीज्ञ सौ.स्मिता कांदलगावकर त्याच्या सोबत गोदातट स्वच्छता अभियानास कटीबध्द असलेले अजय टोले, अर्जून चव्हाण, सुचित नरवाडे, संदिप पवार. या स्वच्छतेच्या शिलेदारा बरोबरच कांही मुस्लिम बांधव ही जोडले गेलेले आहेत!




गोदावरी स्वच्छता मोहिम : समाजासाठी आदर्श उपक्रम

गोदावरी काठावरील वाढते प्रदूषण, कचरा, धार्मिक वस्तूंची अनियंत्रित विल्हेवाट आणि प्लास्टिकचा वाढता वापर यामुळे नदीचे आरोग्य धोक्यात आले होते. ही चिंताजनक परिस्थिती ओळखून राजू देशमुख कांलगावकर यांनी आपल्या सहचारिणीसह ''गोदावरी स्वच्छता मोहिम'' सुरु केली. त्यांच्या नेतृत्वाखाली ही मोहिम दिवसेंदिवस व्यापक होत गेली.

मोहिमेची वैशिष्ट्ये :

स्वच्छता उपक्रमांचे नियमित आयोजन- आठवड्याच्या ठराविक दिवशी नदीकाठावर स्वच्छता मोहीम राबवून कचरा संकलन, नालेसफाई तसेच प्लास्टिक निर्मूलन केले जाते.

स्थानिक नागरिकांचा मोठा सहभाग शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि ग्रामस्थ यांना प्रेरित करून सामूहिक प्रयत्नातून नदी शुद्धीचा संदेश पोहोचवला जातो.

पर्यावरण जनजागृती नदीप्रदूषणाचे दुष्परिणाम, पाणी संवर्धनाचे महत्त्व आणि स्वच्छतेची गरज याबाबत नियमित जनजागृती कार्यक्रम घेतले जातात.

धार्मिक आणि सांस्कृतिक शिस्ती वर भर,धार्मिक कार्या निमित्त नदीकिनारी होणारा कचरा कमी करण्यासाठी पर्यायी व्यवस्था, दानपेट्या आणि सचेतना राबवली जाते. शोकांतिका ही आहे की,मृत झालेल्या व्यक्तीचे कपडे, अस्थी, राख, व वापरलेले कपडे पवित्र गोदामातेच्या पात्रात प्रवाहीत करुन जल प्रदूषण करतात. हे कुठेतरी खंडीत करणे ही काळाची गरज आहे!



डॉ.श्याम वा.कुलकर्णी, महाळूंगे,पुणे, मो. 98238 09656

स्वत:चा व्यवसाय सांभाळत पर्यावरणाची वकीली करणारे व स्वत:ची दिनचर्या गोदामातेची स्वच्छतेची उपासना करणारे राजू व स्मिता कांदलगावकर आणि नदी स्वच्छता अभियानाची जबाबदारी पारपाडणारे त्यांचे साथिदार नदीबद्दल असलेली श्रद्धा, प्रेम आणि जबाबदारी प्रत्यक्ष कृतीतून दाखवत आहेत. त्यांनी स्वतःच्या खर्चातून आणि वैयक्तिक वेळ देऊन हा उपक्रम जिवंत ठेवलेले आहेत! खर्या अर्थाने या मोहिमेत जोडलेले सर्व जण गंगापूत्र आहेत!



# अण्णाभाऊ साठे यांची कला ही प्रचारासाठी नव्हे, तर समाजाला जागं करण्यासाठी होती-प्रा. सतीश आळेकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग तसेच महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्या सहकार्याने अण्णा भाऊ साठे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव समिती व निर्मिती मीडिया सोल्युशन्स आठव्या अण्णाभाऊ साठे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची मोठ्या दिमागात सांगता झाली याप्रसंगी प्रा. सतीश आळेकर, अभिनेते मकरंद अनासपुरे, पंकज चव्हाण (सांस्कृतिक विभाग महाराष्ट्र शासन), सचिनभाऊ साठे (लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नातू) सुनिल सुकधनकर (दिग्दर्शक व महोत्सव परीक्षक), उमेश कुलकर्णी (दिग्दर्शक व महोत्सव परीक्षक) संतोष पाठारे (चित्रपट समीक्षक), निलेश रसाळ (चित्रपट समीक्षक) राधा खुडे (गायिका), संदिप भाऊ ससाणे (संयोजक) आदी मान्यवर उपस्थित होते.

सतीश आळेकर म्हणाले की, तरुण पिढीचा मोठ्या प्रमाणावरचा सहभाग ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. चित्रपट व रंगभूमी क्षेत्रात काहीतरी करण्याची तरुणांची इच्छा आशादायक असल्याचे त्यांनी सांगितले. लोकशाहीर अमर शेख आणि अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांनी समाजाला योग्य दिशा दिली, असे त्यांनी नमूद केले. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे प्रचारासाठी नसून वास्तववादी आणि सौंदर्यपूर्ण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कलेसोबत भाषा आणि विचार यांचा समन्वय साधणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

> ''अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने आणि आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मिळालेला पुरस्कार माझ्यासाठी भाग्याचा क्षण आहे. गावाकडून महानगरात आलेल्या कलाकाराचा संघर्ष हा ओळखीपेक्षा जगण्यासाठीचा असतो. रंगभूमीपासून चित्रपटापर्यंतचा माझा प्रवास संघर्षाचा राहिला, मात्र योग्य वेळी चांगल्या माणसांची साथ मिळाल्यामुळेच मी घडू शकलो. नाना पाटेकर आणि दिवंगत निळूभाऊ फुले यांच्यासारख्या महान कलाकारांनी मला माणुसकी आणि कलेची खरी शिकवण दिली. शेतकऱ्यांच्या भूमिकेत काम करताना त्यांचे दुःख जवळून अनुभवले आणि ते आयुष्यभर विसरता येणार नाही. कलेत प्रामाणिकपणा आणि माणुसकी जपली तरच कलाकार टिकतो.''
>
> **– मकरंद अनासपुरे**

उत्कृष्ट लघुपट द फस्ट फिल्म दिग्दर्शक पियुष ठाकूर, उत्कृष्ट दिग्दर्शक गणेश शेलार, चित्रपट अंतर, उत्कृष्ट छायाचित्रण प्रथमेश रंगोळे, चित्रपट केकी, उत्कृष्ट माहितीपट (विशेष उल्लेख), ॲथलीट्स आर मॅड, दिग्दर्शक ईरा देवकुळे, उत्कृष्ट माहितीपट ब्रीदिंग ब्ल्यू, दिग्दर्शक अविष्कार रविंद्र, उत्कृष्ट ध्वनी अभय रुमडे, लघुपट देवा आज पण व्हाय, उत्कृष्ट पटकथा गणेश शेलार, लघुपट अंतर, उत्कृष्ट संकलन हिमांशु पिले, लघुपट द फिनिश लाईन, सर्वोत्कृष्ट अभिनेता (पुरुष) विठ्ठल काळे लघुपट ''कूस / अंतर / केकी'' या लघुपटातील भूमिकांसाठी हा पुरस्कार मिळवला. सर्वोत्कृष्ट अभिनेत्री वासुदेव निशाद लघुपट ''प्रियांका बेरिया'',

सर्वोत्कृष्ट अभिनेता (पुरुष) विशेष उल्लेख म्हणून वासुदेव निशाद लघुपट ''द फर्स्ट फिल्म'', सर्वोत्कृष्ट अभिनेत्री विशेष उल्लेख पुरस्कार नीता शेंडे लघुपट ''अंतर'', बालकलाकार सर्वोत्कृष्ट बालकलाकार पुरस्कार आरव आहेर लघुपट ''केकी'', विशेष उल्लेख बालकलाकार जान्हवी सोनवणे लघुपट ''रंग'', अंजली निंबाळकर लघुपट किरण'', तांत्रिक विभाग सर्वोत्कृष्ट कला दिग्दर्शक पुरस्कार आकाश हुमणे लघुपट ''फिंगर रिंग'' यांना मिळाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती कडू आणि हेमंत फरांदे यांनी केले.

# आत्मचिंतन आणि विचार मंथन करणारा संकल्प अपेक्षित

**ज्योतिर्मय साहित्य**

२०२५ साल संपायला आति काही दिवसच बाकी आहे. मागे वळून बघितले असता अनेक गोष्टी घडून गेलेल्या आहेत, त्याचा मागोवा घेणे आणि येणाऱ्या नवीन २०२६ या वर्षात त्यात काही चांगले करता येईल का किंवा करायला पाहिजे असा विचार सर्व पातळीवर होणे तेवढेच आवश्यक आहे.

शिक्षण क्षेत्र, महिलांवरील अत्याचार, सोशल मीडियाचा अतिरेक, शेतकरी वर्गातील अस्वस्थता, बेरोजगार युवकांचा प्रश्न, महागाई, राजकारणातील हेवेदावे, तत्वहीन राजकारण, वाढती गुंडगिरी. राजकारणाची घसरलेली पातळी, मराठी भाषा संवर्धन आणि मराठी शाळेचे प्रश्न, पर्यावरण, प्रदूषण, अशा अनेक गोष्टीवर विचार मंथन होणे आवश्यक आहे.

तरुण पिढी बेरोजगारीच्या विळख्यात सापडली आहे. या बेरोजगारीच्या विळख्यातून बाहेर पडण्यासाठी तरुणांनी व्यवसायाकडे वळायला पाहिजे, तर ती व्यसनाकडे वळत आहे.

जालना जिल्ह्यात शाळेत मुलांचे शिक्षकांचे त्रासाला कंटाळून मुलीने केलेली आत्महत्या.

प्रॅक्टिकलचे गुण वाढवून देण्याच्या बहाण्याने १६ वर्षीय विद्यार्थिनीस घरी बोलावून शिक्षकाने तिच्यावर केलेला बलात्कार. पीडितेच्या मैत्रिणीला व्हिडीओ कॉल करून स्क्रीन रेकॉर्डींग करायला लावणे, धमकावून लैंगिक अत्याचार करणे, जुन्नर तालुक्यातील ओतारी येथील सात वर्षाच्या मुलीवर शेजाऱ्याने लैंगिक अत्याचार केल्याची घटना, पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी गेलेल्या महिलेवर पोलीस स्टेशनमध्ये केलेले लैंगिक अत्याचार,

लॉजमध्ये रूम चुकून दुसऱ्या रूममध्ये गेलेल्या महिलेवर मद्यधुंद अवस्थेत तिघांनी केलेला बलात्कार, सांगलीच्या ईश्वरपूर परिसरात इयत्ता आठवीत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीवर दोन जणांनी केलेला बलात्कार, अमरावतीत एक धक्कादायक घटना घडली. दिव्यांग अल्पवयीन मुलीवर घरात शिरून दोन तरुणांनी लैंगिक अत्याचार केला. ही गंभीर घटना उघडकीस आली. हे अमानुष प्रकार काय दर्शवितात ? वैचारीक पातळी किती खालावलेली आहे.

महिलांवरचे अत्याचार हा एक मोठा विचार करायला लावणारा प्रश्न आज समाजात आ वासून उभा आहे. दोन वर्षाच्या मुलीपासून तर ६०/६५ वर्षाच्या महिलांवर काही नराधमाने बलात्कार केल्याचे आपल्या वाचनात येते, समाजातील अशा घातक मनोविकृत व्यक्ती आहेत ज्यांच्यामुळे परिवारातील आणि समाजातील सर्वसामान्य कुटुंबातील महिलांना एकटीला घराबाहेर जाणे कधी कधी त्रासदायक होते. हे नराधम केवळ बलात्कारावर थांबत नाहीत तर पुरावा नष्ट करण्यासाठी त्या मुलीचा अथवा महिलेचा खून देखील करतात इतकी क्रूरता या समाजातील काही मनोविकृत लोकांमध्ये भरलेली दिसून येते.''

शाळेत विद्यार्थ्या समोर शिक्षक दारु पिउन धिंगाणा घालतात. जिथे संस्कार होणे अपेक्षित असते त्या ठिकाणी अशाप्रकारे अशी कृती घडत असेल तर शिक्षण विभाग काय करत आहे ? हा एक प्रश्न उपस्थित केला जातो. शाळेमध्ये दारू पिणे मुलीशी लैंगिक चाळे करणे अशा प्रकारांना ताबडतोब आळा बसायला हवा.




अशा शिक्षकांना नोकरीतून बडतर्फ करायला हवे. कडक कारवाई करावी.

अशा हजारो घटना आपल्या आजूबाजूला घडत आहेत अशाप्रकारे होणारे स्त्रियांवरील अत्याचार, हिंसाचार कमी करायचा असेल तर कायदे आणि त्यांची कडक अंमलबजावणी करणे आवश्यक आहेच, पण त्या बरोबरच स्त्री-पुरुषांची मानसिकता बदलण्यासाठी काही महत्त्वाच्या गोष्टी कराव्याच लागतील. आपल्या समाजासमोरचे हे फार मोठे आव्हान आहे.लाडक्या बहिणीच्या सुरक्षिततेची हमी घ्यायला हवी.

भ्रष्टाचाराने तर परिसीमा गाठली आहे. एका जिल्ह्याततर तलाठ्यांनी पूरग्रस्त मदतीत तब्बल १०० कोटींचा भ्रष्टाचार केला. स्वतःच्या सग्यासोयऱ्यांकडे शेतकऱ्यांचे पैसे वळवले.ही बातमी आपण वाचली असेलच.

भ्रष्टाचाराच्या केस मध्ये अनेक सरकारी अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, पोलीस अधिकारी, गटविकास अधिकारी, शिक्षणाधिकारी, राजकीय क्षेत्रातील नेते, अभियंते, आदी निरनिराळ्या खात्यात असंख्य कर्मचाऱ्यांना, अधिकार्यांना पकडल्याचे आपण नेहमी वाचतो. अद्यापही ''ना खाऊंगा ना खाने दूंगा'' याची पूर्तता झालेली नाही.हे राज्य बेवारस झालेलं आहे का ? कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही. कोणाचं कोणावर नियंत्रण नाही. कोणाचा कोणाला धाक नाही. असे का व्हावे.? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

सबका साथ सबका विकास नावाखाली अनेक पक्षातील मंडळी सत्ताधारी पक्षात सामील होत आहेत. विकासासाठी आम्ही सत्तेत सामील होत आहे हेच पालूपद आहे. त्यांची तत्त्व जुळत नसली तरी सत्तेसाठी ते सामील होत आहे हे सांगायला नको. आत्ताच नुकत्याच नगर पंचायत, नगरपरिषद निवडणुकांमध्ये युतीमधीलच पक्ष एकमेका समोर उभे राहिले म्हणजे सत्तेसाठी काहीही.....

सोशल मीडियाचा आता अतिरेक झालेला आहे. ज्याचा उपयोग विकासासाठी व्हायला हवा ते चित्र काही वेगळेच दिसते आहे. त्यामुळे समाज अधोगतीकडे चालला आहे हे स्पष्ट दिसते. राजकीय क्षेत्रातील महिलांच्या वक्तव्यावर अतिशय खालच्या पातळीवर प्रतिक्रिया दिल्या जात आहेत. टिप्पणी केली जाते. तसेच वारंवार काही महिलांचे फोटो टाकून त्याच्यावरही अश्लील ती टिप्पण्या केलेल्या असतात. एकीकडे महिला सन्मानाच्या गोष्टी करायच्या आणि दुसरीकडे अशाप्रकारे त्यांची विटंबना केली जावी आणि त्यावरही काही बंधन नसावे याचे आश्चर्य वाटते.अगदी पंतप्रधान, गृहमंत्री मुख्यमंत्री राजकीय क्षेत्रातील महिला यांचे विकृत चित्र ही पोस्ट केले असतात.

फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सअप, यु ट्युब, आदी गोष्टीमुळे विद्यार्थी तसेच तरुण पिढीचे लक्ष केंद्रित झाले असल्यामुळे सहाजिकच त्यांची वाचनाची आवड कमी झाली आहे. शहरी भागात जरी पुस्तक महोत्सव वगैरे होत असले तरी सर्वच भागामध्ये त्याचा परिणाम नसतो. साठ टक्के जनता ग्रामीण भागात विखूरली आहे.

अशावेळी ज्या ठिकाणी वाचकांपर्यंत पुस्तक जाणे आवश्यक आहे तिथे असे कार्यक्रम व्हायला हवे. जेणेकरून विद्यार्थी वर्गावरील फेसबुक इंस्टाग्राम युट्युब याचे वेड कमी होईल. तसेच सध्या युट्युब वर फार मोठ्या प्रमाणावर वेगवेगळे विषयावरील व्हिडिओ शॉट्स येत असतात बऱ्याच वेळा अशा व्हिडिओमधील सत्यता काय आहे हे समजत नाही आणि त्यामुळे वैचारिक गोंधळ निर्माण होतो आणि त्याचे परिणाम समाजात होताना दिसतात.

अश्लील आणि अचकटविचकट रील्स बनवण्याचे आणि पाहण्याचे प्रमाण इतके वाढले आहे की त्यामुळे लहान मुलांच्या मानसिकतेवर गंभीर परिणाम होत आहेत. ''मोबाईलच्या अतिप्रमाणात होणाऱ्या वापरावर समाज माध्यमातून अथवा मोठमोठ्या शाळा महाविद्यालयातून जनजागृती करून याला प्रतिबंधात्मक उपाय करणे गरजेच आहे.'' यासाठी प्रत्येकाने स्वतः पुढे येवून स्वतः पासून सुरुवात करून समाजाला हा संकल्प करून दाखवला पाहिजे तरच येणारी उद्याची नवीन पिढी जागृत होईल अन्यथा याचे परिणाम संपूर्ण देशाला भोगावे लागणार आहे.




वर्षभरात येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्याची अतोनात नुकसान झाल्यामुळे शेतकरी वर्ग चिंतित झालेला आहे वेळोवेळी त्याला सरकारी मदत नुकसान भरपाई देण्याची आश्वासन दिले गेले त्यातील काही प्रमाणात पूर्तता झाली.पिक विमा रक्कम मिळाली नाही. कर्जमाफीचे प्रकरण मात्र ३० जून पर्यंत पुढे ढकलले गेले आहे. त्यातही ३१ मार्च २०२६ ला जे शेतकरी थकबाकीदार होतील त्यांना कर्जमाफी मिळणार का ? हा प्रश्न मात्र अनुत्तरित राहिला आहे. त्यामुळे शेतकरी वर्गातही मोठ्या प्रमाणात गोंधळ आहे.त्यात स्पष्टता नाही. सत्तेच्या राजकारणात शेतकऱ्याचे प्रश्न बेरोजगारीचा प्रश्न, महागाई स्त्री अत्याचार , भ्रष्टाचार, मराठी भाषा संवर्धन, मराठी माध्यमाच्या शाळाचा प्रश्न, या प्रश्नाकडे दुर्लक्ष होते आहे. सततच्या निवडणुकांमुळे राजकीय नेते सरकारी अधिकारी त्यातच गुंतलेले असतात.आता महानगरपालीका, पंचायत समितीच्या, जिल्हा परिषदेच्या निवडणूका सततच्या निवडणुकांमुळे राजकीय नेते सरकारी अधिकारी त्यातच गुंतलेले असतात.

राजकीय क्षेत्रात, समाजात एकूणच दुर्जन शक्तीचा प्रभाव वाढलेला आहे. वाढत चालला आहे .सज्जनशक्ती अपुरी पडत आहे अशावेळी या सगळ्या घटनांचा विचार करता कुठेतरी या बाबतीत विचार मंथन होणे आवश्यक आहे. तोच ह्या नववर्षाचा म्हणजे २०२६ चा संकल्प ठरावा. नववर्षात केवळ कॅलेंडर बदलत नाही, तर आत्मपरीक्षण, आत्मविश्वास वाढवणे आणि स्वतःला सुधारण्यासाठीची संधी आहे. नवीन संकल्प, नवीन अपेक्षा आणि सकारात्मक विचारांची बीजे इथे रोवली जातात.निरोप आणि नववर्षाचे स्वागत सर्वत्र पाहायला मिळेल. आशा करू या की, या जल्लोषाबरोबरचा उत्साह प्रत्येक क्षेत्रात ऊर्जा देणारा ठरो. मंगलदायी ठरो.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबावदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559